# १. प्रस्तावना



**एकनाथ डवले,**
**आयुक्त, पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

पशुसंवर्धन व्यवसाय हा शेतीला पूरक असा व्यवसाय आहे. शेतीचे काम ठराविक कालावधीत असते त्यामुळे उर्वरित काळात त्यांना उद्योग मिळू  शकत नाही. पशुसंवर्धन व्यवसायामुळे शेतकऱ्यांना आता बाराही महिने पूरक व्यवसाय मिळणे शक्य असल्याने, तसेच आपला आहार सकस व संतुलीत असण्याच्या दृष्टीने दूध, अंडी व मांस अशा सारखी पशुजन्य उत्पादने आवश्यक असल्याने पशुसंवर्धन जोडधंद्याऐवजी मुख्य व्यवसाय होऊ पहात आहे. त्यादृष्टीने विभागाने कुक्कुट पालन, संकरित गायीची पैदास, स्थानिक जातीच्या गोवंशामध्ये सुधारणा, शेळी-मेंढी विकास या कार्यक्रमावर भर देऊन शेतकऱ्यांना आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांचा तसेच सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाने यावर लक्ष केंद्रीत केले आहे.

पशुसंवर्धन विभागाची सुरूवात २० मे १८९२ मध्ये मुंबई प्रांताकरिता मुलकी पशुवैद्यक विभाग म्हणून झाली होती. मुलकी पशुवैद्यक विभागाकडे अश्वपैदास, पशुरोग नियंत्रण आणि पशुवैद्यकिय अध्यापन याप्रमाणे ३ प्रधान कार्ये सोपविली गेली. पशुसंवर्धन विभागाने पशुवैद्यकिय अध्यापनासाठी मुंबई, (परळ) येथे पशुवैद्यक महाविद्यालयाची स्थापना १८८६ मध्ये केली. त्यावेळी कृषि, अश्व व पशुबाबतची अद्ययावत माहिती लोकांना होण्याच्या उद्देशाने कृषि, अश्व व पशुप्रदर्शने आयोजित करण्यात येत होती. पहिले कृषि, अश्व व पशुप्रदर्शन १८८५-८६ सालात दख्खन प्रांतात अहमदनगर येथे आयोजित करण्यात आले होते. प्रथम पशुवैद्यकिय दवाखान्याची निर्मिती १ एप्रिल, १८९२ रोजी धुळे व नाशिक जिल्ह्यात झाली. १९१८ मध्ये पशुपैदास कार्यक्रम कृषि विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला.

सन १९२४ मध्ये अश्वपैदास कार्यक्रम मुलकी पशुवैद्यक विभागामधून वेगळे करून विभागाकडे केवळ पशुरोग नियंत्रणाचे कार्य सोपविण्यात आले. सन १९३२ पासून अखिल भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या अनुदानाने पशुरोग अन्वेषण कार्य मुंबई येथील पशुवैद्यक महाविद्यालयात सुरू करण्यात आले.

देशी गाई, गावठी गाई पासून सुधारित जातीच्या जनावरांची पैदास करण्याच्या उद्देशाने वळू योजना १९३१-३२ या वर्षापासून सुरू करण्यात आली. सदर योजनेअंतर्गत सुधारित देशी जातीच्या वळूंपासून गावठी गायींशी संकर करून सुधारित जातीची पैदास करण्यात येत असे. पशुसुधार करण्याच्या उद्देशाने, दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे उत्तम जातीच्या वळूंची वंशावळ तयार करुन तसेच सर्व प्रमुख जातीच्या वळूंची नोंद करून संपूर्ण माहिती संकलित करण्यात येत होती.

सन १९३३ मध्ये मुंबई पशुसुधार कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये पैदाशीच्या वळू व्यतिरिक्त इतर सर्व वळूंचे खच्चीकरण करण्याचे नियमन करण्यात आले. कृषि अनुसंधान परिषदेतर्फे १९ ऑक्टोबर, १९३६ मध्ये खडकी, (जिल्हा पुणे) येथे कुक्कुट पैदाशीच्या संशोधनाकरीता आर्थिक तरतूद करण्यात आली व व्हाईट लेग हॉर्न, -होड आयलंड रेड, ब्लॅक मिनॉर्का जातीच्या विदेशी कोंबड्या ठेवण्यात आल्या होत्या.

भारत सरकारच्या विद्यमाने मे, १९३७ मध्ये पशुपालकांना सुधारित पशुंची पैदास करण्याच्या हेतूने जातीवंत वळू पुरविण्याची योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत सुधारित म्हशींची पैदास व वैरण विकास कार्यक्रमाचा सुध्दा समावेश करण्यात आला.

मुंबई अत्यावश्यक सामग्री आणि पशु (नियंत्रण) कायदा, १९४६ अन्वये उपयुक्त जनावरांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आली.

१९४७ मध्ये कृषि विभागाकडील पशुसंवर्धन संस्थांचे पशुवैद्यक विभागाकडे हस्तांतरण करण्यात येऊन पशुसंवर्धन तथा पशुवैद्यकीय विभाग म्हणून नामकरण करण्यात आले.

१९ जुलै, १९४७ मध्ये पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे स्थापन करण्यात आली. या संस्थेमध्ये पशु पक्ष्यांच्या साथींच्या रोगांवरील रोग प्रतिबंधक लसींचे उत्पादन केले जाते. मुंबई प्राणी संरक्षण कायदा, सन १९४८ पासून लागू करण्यात आला. याच वर्षात रोग अन्वेषण कार्य राज्य शासनाकडे सुपूर्द करण्यात आले. सांसर्गिक पशुरोग नियंत्रणाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी मुंबई सांसर्गिक पशुरोग (नियंत्रण) कायदा, १९४८ लागू करण्यात आला. पशुरोग अन्वेषणाकरीता राज्यस्तरावर पुणे येथे व विभागीय पातळीवर ६ ठिकाणी विभागीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा (गुरे व गो-स्तनदाह, शेळ्या, मेंढ्या व इतर रोग, कुक्कुट, सालमोनेल्ला) स्थापन केलेल्या आहेत. विभागीय पातळीवरील संस्थांना तांत्रिक बाबीसाठी पुणे येथील रोगअन्वेषण विभाग ही राज्यस्तरीय संस्था मार्गदर्शन करीत आहे.

कृत्रिम रेतनाद्वारे पशुपैदास कार्यक्रमास सन १९४८ मध्ये मंजुरी प्राप्त झाली, परंतू प्रत्यक्ष कार्यास सन १९५० पासून पुणे येथे सुरूवात झाली. जनावरांमध्ये दुग्ध उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने देशी दुधाळ जातीच्या रेडसिंधी, गीर व साहिवाल तसेच महिष वर्गात सुरती व मु-हा जातीच्या वळू/रेड्यांच्या कृत्रिम रेतन कार्यक्रमात अंतर्भाव करून पैदाशीद्वारे गावठी जनावरांमध्ये सुधारणा करण्याकरीता वापर करण्यात येऊ लागला. तसेच ओढ कामास व शेती कामास उपयुक्त खिल्लार जातीच्या वळू पासून कृत्रिम रेतन करुन उत्कृष्ट पैदास करण्यास सुरूवात करण्यात आली.

कृत्रिम रेतन कार्यामध्ये सुरूवातीस द्रवविर्य वापरण्यात येत असे. दुग्धउत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने विदेशी दुधाळ जातीच्या होलस्टीन फ्रिजीयन व जर्सी जातीच्या वळू पासून गावठी गायीशी कृत्रिम रेतनाने संकर करून संकरित गायींची पैदास करण्यास सन १९६७ मध्ये सुरूवात करण्यात आली. सन १९६८ पासून परदेशातून आयात केलेल्या गोठविलेल्या रेतमात्रांचा वापर सुरू करण्यात आला. गोठविलेले रेत वापरणे जास्त किफायतशीर व फलदायी असल्याने सन १९८० मध्ये पुणे येथे डॅनिडा यांच्या सहकार्याने गोठीत रेत प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली. तसेच सन १९८५ मध्ये नागपूर येथे व सन १९९२ मध्ये औरंगाबाद येथे गोठीत रेत प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या.

मुंबई व्हेटर्नरी प्रॅक्टीशनर्स ॲक्ट, १९५६ पासून लागू करण्यात आला. कृषि विभागाशी संलग्न असलेल्या पशुसंवर्धन विभागाचे जुलै, १९५७ मध्ये विभाजन करून पशुसंवर्धन विभाग असे नामकरण आणि विभाग प्रमुखाचे संचालक, पशुसंवर्धन विभाग असे संबोधन करण्यात आले. तद्नंतर संचालक हे पद पदोन्नत करून त्यास आयुक्त, पशुसंवर्धन विभाग असे दिनांक ५/११/१९९३ पासून संबोधण्यात येत आहे. मुंबई व्हेटर्नरी कौन्सिलची स्थापना सन १९५७ मध्ये करण्यात आली. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. लोकशाहीचे विकेंद्रीकरण १ मे, १९६२ रोजी करण्यात येऊन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निर्मिती करण्यात आली. पशुसंवर्धन विभागाच्या अखत्यारितील २० योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आल्या.

पशुसंवर्धन हा शेतकरी व पशुपालकांचा बारमाही व्यवसाय आहे. पशुसंवर्धन हा व्यवसाय शेतीस पूरक तर आहेच परंतु आजच्या गतीमान युगात या व्यवसायास उद्योगाचे स्वरूप आले आहे. १९९८ साली भारताचा दुग्धोत्पादनात जगामध्ये प्रथम क्रमांक होता. सन २००९-१० मध्ये राज्यातील एकूण अंदाजित दूध उत्पादन ७६७९ हजार मे. टन इतके होते. ते सन २००८-०९ मधील ७४५५ हजार मे.टन अंदाजित दूध उत्पादनापेक्षा ३.०० टक्क्यानी अधिक होते. एकूण गाईच्या दुग्धोत्पादनामध्ये संकरित गाईच्या दुधाचा वाटा ७१.०० टक्के होता. तसेच सन २००९-१० मध्ये मांसाचे अंदाजित उत्पादन ५४५ हजार मे. टन होते. ते सन २००८-०९ मधील ५३६ हजार मे. टन उत्पादनापेक्षा १.६८ टक्क्यांनी अधिक होते.

पशुसंवर्धनामुळे शहरी तसेच ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होत आहे. पशुपालन क्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीची जास्तीत जास्त क्षमता आहे. पशुसंवर्धनाच्या विविधांगी योजनांनी पशुपालक व पशुसंवर्धनाशी निगडीत असलेल्या सर्व व्यवसायांची भरभराट झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील पशुपालकांचा आर्थिक विकास होऊन त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यामध्ये पशुसंवर्धन विभागाचा मोठा वाटा आहे. पशुसंवर्धनामुळे व्यक्ती व समाजाच्या उन्नती बरोबरच हा उद्योग राष्ट्रीय उत्पन्नात भर घालण्यास निश्चितच मदत करतो.

कृषि व संलग्न सेवा अंतर्गत सन २००९-१० या वर्षात राज्याच्या एकूण सकल घरगुती उत्पादनामध्ये (GDP) १०.१९ टक्के एवढा हिस्सा आहे. म्हणजे राज्याचे ९,०१,३३० कोटी रुपये एवढ्या उत्पादनामध्ये कृषि व संलग्न सेवा यांचे ९१,८०६ कोटी रुपये एवढे सकल घरगुती उत्पादन होते. तसेच राज्याच्या उत्पादनामध्ये पशुसंवर्धन विभागाचा २.५६ टक्के एवढा हिस्सा आहे.

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या माहिती पुस्तिकेद्वारे पशुसंवर्धन विभागातील विविध विभाग/संलग्न संस्था यांची रचना व कार्यपध्दती तसेच त्यांच्यामार्फत केंद्रपुरस्कृत/राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय राबविण्यात येणाऱ्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी लोकप्रतिनीधी, शेतकरी, प्रशासकीय अधिकारी, पशुसंवर्धन क्षेत्रातील पशुवैद्यक तसेच पशुसंवर्धन विभागाशी निगडीत विविध संस्था यांची माहिती उपलब्ध होईल. त्यामुळे विकास कामांच्या प्रक्रियेमध्ये ते अधिक चांगल्या प्रकारे सहभागी होऊ शकतील. तसेच पशुसंवर्धन विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यास या पुस्तिकेची मदत होईल अशी मला खात्री आहे.

**एकनाथ डवले,**
**आयुक्त, पशुसंवर्धन**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**